दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २६८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२८ डिसेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# सीमवासियांना ठाम पाठींबा ; विधिमंडळात एकमुखी ठराव मंजूर

**दै.रायगड नगरी । नागपूर**

**कर्नाटकमधील ८६५ मराठी भाषिक गावांची इंचन इंच जागा महाराष्ट्राची असून सीमा भागा-तील मराठी भाषिकांच्या पाठिशी महाराष्ट्र सरकार खंबीरपणे उभं असल्याचा ठराव मंगळवारी (दि.२७) विधानसभेत एकमतानं मंजूर करण्यात आला. गेल्याच आठवड्यात कर्नाटक सरकारनं सीमाप्रश्नावर एकमतानं ठराव मंजूर केला होता. त्यामुळे महाराष्ट्र सरकारवर दबाव वाढला. अखेर विधिमंडळात बेळगाव सीमा प्रश्नावर ठराव एकमतानं मंजूर करण्यात आला. हिवाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून विरोधकांनी सातत्यानं बेळगाव सीमाप्रश्नाचा मुद्दा उपस्थित केला जात होता. या प्रश्नावर ठराव आणण्याची मागणी केली जात होती.**



कर्नाटक सरकारच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा निषेध करणारा ठराव विधिमंडळात मांडण्यात आला. तो एकमतानं मंजूर करण्यात आला. याचबरोबर बेळगाव, कारवार, निपानी, बिदर या शहरांसह सर्वोच्च न्यायालयातील दाव्यातील सर्व गावं कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात पाठपुरावा करण्यात येईल. सनदशीर मार्गानं लढा देण्यात येईल. ८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत मराराष्ट्र सर्व ताकदीनिशी उभे राहील, अशा आशयाचा ठराव एकमतानं मंजूर झाला.

महाराष्ट्र विधानसभा नियम ११० नुसार कर्नाटकातील मराठी भाषिक (बेळगाव, कारवार, बिदर, बालकी, निपाणी) ८६५ गावातील इंच इंच जागा महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. गेल्या अनेक दिवसांपासून कर्नाटक सीमा प्रश्नामुळे वाद पेटला आहे. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी आक्रमक भूमिका घेतली असताना शिंदे-फडणवीस बोटचेपी भूमिका घेत असल्याचा हल्लाबोल विरोधकांनी केला. अखेर आज विधिमंडळात या प्रश्नावर ठराव मांडण्यात आला. तो एकमतानं मंजूर झाला.

सीमाभागातील गावांच्या विकासाठी योजनांच वचन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. मराठी माणसांवरील अन्याय दुर करणार. बेळगाव निपाणीसह ८६५ महाराष्ट्रात सामील करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच, १५ वर्ष महाराष्ट्रात वास्तव्यास असल्यास सरकारी नोकरीची संधी देणार. यासोबतच, बलिदान देणाऱ्या कुटुंबाला अर्थिक मदतीची घोषणा केली. कुटूंबाला दरमहा २० हजाराची मदत जाहिर केली. तसेच, सांस्कृतीक शैक्षणिक मदत जाहिर करण्यात आली. यासोबत सीमावरती भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक जागा राखून ठेवणार, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माहिती दिली.

# पेट्रोल टँकरच्या टाकीचा स्फोट ; २ जण गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहरातील हाळ बुद्रुक गावाच्या हद्दीत जुन्या मुंबई-पुणे महामार्गालगत सागर हॉटेल समोर दुपारी १ वाजेच्या सुमारास गॅरेज येथे वेल्डिंगचे काम करण्यासाठी आलेल्या टँकर (क्र.एमएच ४६, बीएफ ७५७०) च्या रिकाम्या पेट्रोल टाकीला वेल्डिंग करीत असताना टँकरचा स्फोट झाला.



प्रत्यक्षदर्शी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार टँकरची टाकी ब्लास्ट होऊन टाकीचे झाकण उडाल्याने टँकर ड्रायव्हर जुबेर शहा याच्या पायावर पडल्याने दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले असून वेल्डर मुन्ना हा देखील काही प्रमाणात भाजला आहे. या अपघातातील जखमींना उपचारासाठी एमजीएम रुग्णालय कामोठे, पनवेल येथे हलविण्यात आले आहे.

या अपघातची माहिती मिळताच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी या सामाजिक संस्थेचे विजय भोसले, विशाल चव्हाण, हनीफ कर्जीकर, गुरूनाथ साठेलकर यांच्यासह टीमचे सदस्य, अग्निशमन दलाचे जवान, तसेच ग्रामस्थ आदींनी धाव घेऊन अपघातग्रस्तांना मदत केली.

# उद्धव ठाकरे भाजपला होम ग्राऊंडवर आव्हान देणार, नागपूरमध्ये मोठी घोषणा

**दै.रायगड नगरी । नागपूर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी नागपूरमध्ये पदाधिकारी मेळाव्याला संबोधित केलं. यावेळी त्यांनी एकनाथ शिंदे आणि भाजपवर हल्लाबोल केला. याशिवाय भाजपसोबत युती असताना जी चूक झाली ती चूक आता पुन्हा करायची नाही, असं म्हटलं. कोणी कोणावर विश्वास ठेवायचा हा सध्या मोठा प्रश्न आहे. लोकशाहीत गुप्त मतदान असतं, पण आता आपलेच मतदान आपल्या पासून गुप्त असतं ते सुरुत, गुवाहटी, गोवा अस फिरतंय, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. अजातशत्रू हा शब्द शिवसेनाप्रमुखांना शब्दच आवडायचा नाही. ज्याला शत्रू नाही तो कसला मर्द असा प्रश्न ठाकरेंनी केला. तुम्ही सगळं चोराल पण आमची हिम्मत चोरु शकणार नाही. सामन्याला समोर या मग दाखवतो बाळासाहेबांचे शिवसैनिक कोण आहेत, असं आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिलं.

नागपूरमध्ये आल्यानंतर पाहिलं तर होर्डिंग्ज लागले आहेत. मी काढलेले फोटो त्या गद्दारांच्या होर्डिंग्जवर आहेत. निवडणुकीला अवकाश आहे अस आपण मानतो. वर्षाभरात मध्यावधी होणार असं वाटत असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. तोतयांनी सांगावे ते भाजपच्या उमेदवारीवर लढणार नाहीत, असं आव्हान देखील त्यांनी दिलं. गेल्या चार पाच महिन्यात किती घोटाळे समोर आले. रोज फुटतायत ती बॉम्बची माळच. मी मुख्यमंत्री असताना लाथ मारून हाकलले तेव्हा आता त्याचा पण घोटाळा निघाला, असं म्हणत संजय राठोड याचं नाव न घेता ठाकरेंनी टीका केली. ठाकरेंनी यावेळी हर्षवर्धन पाटलांचा छान झोप लागते वाक्याचा संदर्भ दिला. ज्यांच्यावर आरोप केले ते सगळे तुमच्याकडे आले आहेत. पंतप्रधान नागपूरला आले होते तेव्हा त्यांनी आजूबाजूला बघायचे होते. भ्रष्टाचारासंदर्भात पंतप्रधानांची भावना प्रामाणिक असेल, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

# दोन अनोळखी इसमांनी केली वृद्ध महिलेची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका वृद्ध महिलेची फसवणूक करून लाखो रुपये किमतीचे दागिने लंपास केल्याची घटना शहरातील मिरची गल्लीच्या नाक्याजवळ घडली आहे.

श्रीमती कोलानजी कारुप्पण करथान (वय ६२, रा. तक्का) या पनवेल येथील गणेश मार्केट येथे बांगड्या घेण्यासाठी गेल्या असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांना अंगावरील सोने कोणीतरी चोरून नेईल असे सांगून त्यांचे सोने पिशवीत काढून ठेवण्यास सांगितले. सदर पिशवी खाली ठेवली असता त्या दोन अनोळखी इसमांनी त्यांची नजर चुकवून जवळपास १ लाख २२ हजार रुपये किमतीचे सोन्याची दागिन्यांची पिशवी घेऊन ते पसार झाले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# कोविडच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

चीनसह अनेक देशांमध्ये कोरोनाबाधितांच्या संख्येत वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासन व राज्य शासनाकडून जिल्हा प्रशासनाला जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्वतोपरी सज्ज राहण्याविषयी सूचना देण्यात आल्या आहेत. यानुषंगाने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे तसेच इतर आरोग्य व संबंधित इतर शासकीय यंत्रणांची बैठक घेवून कोविड प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य प्रशासनाच्या सज्ञतेविषयीची चाचपणी केली. तसेच आरोग्य यंत्रणांनी जनतेच्या आरोग्याविषयी आवश्यक उपाययोजना राबविण्यासाठी पूर्णत: सतर्क राहण्याचेही आदेश त्यांनी दिले.

चीनसह अनेक देशांमध्ये कोरोनाबाधितांच्या संख्येत वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्याशी चर्चा करुन पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील आरोग्य प्रशासनाच्या सज्ञतेविषयीची माहिती घेतली.

यावेळी आयुक्त श्री.देशमुख यांनी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांना माहिती दिली की, पनवेल महानगरपालिकेकडून कळंबोली येथे कोविड समर्पित रूग्णालय कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तयारी सुरू करण्यात आली आहे. पनवेल महापालिका स्वत:ची आरटीपीसीआर लॅब सुरू करणार आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात आरटीपीसीआर चाचण्यांमध्येही वाढ करण्यात येणार आहे. या सर्व कामांसाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचे नियोजन वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येणार आहे. यावेळी श्री.देशमुख यांनी पनवेल महापालिका क्षेत्रात पहिल्या डोसचे १०९ टक्के, दुसऱ्या डोसचे १०२ टक्के तसेच बुस्टर डोसचे १७ टक्के लसीकरण पूर्ण झाले आहे, पनवेल महापालिकेच्या सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोवॅक्सिन लसीकरण सुरू असून लसीकरणाचा दुसरा डोस तसेच बुस्टर डोस राहिला असलेल्या नागरिकांनी लसीकरण करून घेण्याविषयी नागरिकांना पनवेल महापालिकेच्या वतीने आवाहन करण्यात येत असल्याचेही सांगितले.

# हत्या करणाऱ्या दोन आरोपींना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील पोयंजे येथे ८० वर्षीय वृद्ध ईसमाची हत्या केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. सचिन उर्फ शशीभाऊ वाघमारे (वय ३५) व धनराज महादू वाघमारे (वय ३३, दोन्ही रा.पोयंजे आदिवासी वाडी)अशी आरोपींची नावे आहेत. पोयंजे येथील पांडुरंग मऱ्या मते यांच्या कपाळावर, चेहऱ्यावर व डोक्याच्या पाठीमागे वार करून त्यांना ठार मारण्यात आले होते. त्यानंतर त्यांचा मृतदेह वाहत्या पाण्यात टाकून दिला होता.

आरोपींचा शोध घेण्यासाठी पनवेल तालुका पोलिसांनी विविध पथके स्थापन केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून पांडुरंग मते हे रात्रीच्या वेळेस तोंडावर बॅटरीचा प्रकाश मारायचे व सतत शिवीगाळ करायचे. तसेच मते हे शशिभाऊच्या घरी येत असत ते त्याला आवडत नव्हते त्यामुळे त्यांच्यात भांडण देखील झाले होते. याचा राग मनात धरून लाकडी काठीने मारहाण करून पांडुरंग मते यांना ठार मारले. व त्यांचा मृतदेह वाहत्या पाण्यात टाकून ते पळून गेले. न्यायालयात दोघांना हजर केले असता त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

# वाहतूक कोंडी हटवण्यासाठी श्रीवर्धन पोलिसांची धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरामध्ये मागील काही दिवसांपासून वाहतुकीची समस्या अत्यंत जटील होऊन बसली होती. श्रीवर्धन शहरामध्ये एकदा जर का वाहतूक कोंडी झाली तर ती सुटण्यासाठी एक ते दीड तासाचा कालावधी सुद्धा लागत होता. २४ व २५ डिसेंबर ख्रिसमसची लागून सुट्टी आल्यामुळे पर्यटकांनी श्रीवर्धन मध्ये येण्यासाठी एकच गर्दी केली होती.

पर्यटकांसोबतच सहलीच्या बस गाड्या देखील खूप मोठ्या प्रमाणात होत्या. त्यामुळे श्रीवर्धन मधील अरुंद रस्त्यांवरती वाहतूक कोंडी वारंवार होत होती. तसेच श्रीवर्धन बाजारपेठेत बेशिस्तपणे आपल्या दुचाकी उभे करणारे दुचाकीस्वार तसेच अनेक भाजी विक्रेते व दुकानदार आपल्या दुकानासमोर प्लॅस्टिकचे क्रेट मांडून त्यावरती भाजी विक्री करिता ठेवून रस्त्याची दोन ते तीन फूट जागा अडवत होते. याबाबत अनेक वेळा वर्तमानपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर काही वेळेला नगरपरिषदेकडून कारवाई देखील करण्यात आली.

परंतु नगरपरिषदेची कारवाई झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी दुकानदार, भाजी विक्रेते नेहमीप्रमाणे आपली भाजी रस्त्यावरतीच मांडत होते. श्रीवर्धन शहरामध्ये दिवसाकाठी सहलीच्या ५० ते ६० बस गाड्या गावामध्ये येत असतात. तसेच पर्यटकांच्या चार चाकी गाड्या देखील हजारोच्या संख्येने येत असतात. शहरातील अरुंद रस्ते ही मुख्य समस्या असल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होतच असते. मात्र श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी स्वतः वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी धडक मोहीम हाती घेतली आहे. पोलीस जीपमध्ये स्वतः माईक हातामध्ये घेऊन पोलीस निरीक्षक पाटील हे दुचाकी स्वारांना, त्याचप्रमाणे ज्या दुकानदारांनी व भाजी विक्रेत्यांनी आपला माल रस्त्यावर लावला आहे. त्यांना तो त्वरित हटविण्याच्या सूचना देत आहेत. जर सूचनांचे पालन केले नाही तर त्याच्यावरती कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा प्रकारे उद्घोषणा केल्यानंतर अनेक दुकानदारांनी व भाजी विक्रेत्यांनी आपले सामान आत मध्ये घेऊन रस्ता मोकळा करून दिलेला आहे. त्याचप्रमाणे अनेक दुचाकी स्वारांनी सुद्धा आपल्या दुचाकी शिस्तीने रस्त्याच्या एका बाजूला उभ्या केलेल्या दिसून येत आहेत. रायगड जिल्हा वाहतूक शाखेकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळेच श्रीवर्धन पोलिसांना स्वतः लक्ष देऊन अशा प्रकारची कारवाई करावी लागली आहे. तर जनतेमधून नगरपरिषदेचे काम देखील पोलिसांकडून सुरू असल्याबाबत पोलिसांचे अभिनंदन करण्यात येत आहे. भविष्यात देखील पोलीस प्रशासनाने अशाच प्रकारे धडक कारवाई करून शहरात वाहतूक कोंडी होणार नाही व बेशिस्त दुचाकी स्वारांवरती देखील धाक बसेल अशी कारवाई करावी. अशी श्रीवर्धन मधील जनतेची इच्छा आहे.

# गतवर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत करताना शासनाने दिलेल्या सर्व नियमांचे पालन करा : अनिल पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गतवर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत करताना शासनाने आखून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करून स्वागत करा, असे आवाहन पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे मंथन हॉल याठिकाणी ३१ डिसेंबर २०२२ गत वर्षाला निरोप व नव वर्षाचे स्वागत या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दितील असणारे फार्म हाऊस/रिसॉर्ट चे चालक मालक यांच्या एकत्रितपणे बैठकीत केली आहे.



या बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना वपोनि अनिल पाटील यांनी सांगितले की, आपण आपल्या मालकीच्या ताब्यात असलेल्या जागेत नववर्षाच्या स्वागता निमित्त आयोजित करत असलेल्या कार्यक्रमाच्या ठिकाणी कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या लोकांचे जीवितास कोणत्याही प्रकारे धोका होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी आपण घ्यावी., महिला सुरक्षेच्या अनुषगाने योग्य त्या उपाययोजना कराव्यात महिलांची छेडछाड होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. तसेच सदर कार्यक्रमास कोणी मद्यपान केले असल्यास त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या राहत्या घरी सोडण्याची उपाय योजना करावी., सदर कार्यक्रमास आपले फार्म हाऊस रिसॉर्ट हॉटेल रेस्टॉरंट या ठिकाणी कोणीही ड्रग्स अमली पदार्थाचे सेवन किंवा इतर कोणतेही मादक पदार्थाचे सेवन करणार नाही अथवा ठेवणार नाही तसे आढळल्यास संबंधितावर योग्य ती कायदेशीर कडक कारवाई करण्यात येईल., ३१ डिसेंबर २०२२ या दिवसाचा आनंद लुटण्यासाठी काही लोक आपले कुटुंबासह नातेवाईक मित्रपरिवार फार्म हाऊस व फार्म हाऊस वरील पाण्यात पोहण्यास जातात परंतु पाण्यात पडून बुडून कोणाच्या जीवितास धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील., ३१ डिसेंबर २०२२ निमित्त फार्म हाऊस रिसॉर्ट या ठिकाणी मध्य विक्री करावयाची असल्यास संबंधित विभागाकडून योग्य ती परवानगी घेणे अनिवार्य आहे., कोणत्याही प्रकारचा मनोरंजनाचा अथवा अन्य कार्यक्रम विना-परवाना करताना मिळून आल्यास अगर सदर कार्यक्रमात अपघात आक्षेपार्ह कृत्य घडल्यास त्या सर्वस्वी आपणास जबाबदार धरून आपले विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल., आपण अथवा आपल्या कुटुंबासह नातेवाईक मित्रपरिवार हितचिंतकांकडून ३१ डिसेंबर निमित्त प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे शासनाने पारित केलेले आदेशाचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करू नये, जेणेकरून आपले पासून दुसऱ्या त्रास होऊन सार्वजनिक शांतता धोक्यात येईल., कार पार्किंग ठिकाणी भरपूर प्रकाश व्यवस्था व सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात यावे तसेच गाड्यांची तोडफोड, नासधूस, चोऱ्या यास प्रतिबंध करण्यासाठी ज्यादा सुरक्षा रक्षक नेमावेत., अग्निशमन यंत्रणा कार्यरत ठेवावी., किचन मधील सुरक्षितता तपासून घ्यावी गॅस सिलेंडरचा साठा रॉकेल डिझेलचा साठा याकडे विशेष लक्ष पुरवावे., सर्व विद्युत उपकरणांची तपासणी व चाचणी घेऊन ते व्यवस्थित काम करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित विभागाकडून प्राप्त करून घ्यावे. अशा प्रकारचे उपस्थितांना सुचना देण्यात आल्या आहेत. सदर बैठकीकरिता फार्म हाऊस रिसॉर्ट चे चालक मालक असे एकूण ५० जण उपस्थित होते. तसेच फार्म हाऊस रिसॉर्ट चे चालक मालक यांना सी आर पी सी १४९ प्रमाणे नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच जे बैठकी करीता उपस्थित राहिले नाही त्यांना देखील नोटीस बजावण्याचे तजवीज ठेवण्यात आली आहे. यावेळी तालुका हद्दीतील मोठ्या प्रमाणात फॉर्म हाऊस मालक-चालक, हॉटेल व्यावसायिक उपस्थित होते.

# एकनाथ शिंदेंचा भूखंड घोटाळा भाजपने समोर आणला : अजित पवार

**दै.रायगड नगरी । नागपूर**

विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात नागपूर इन्व्हेस्टमेंट ट्रस्टच्या कथित भूखंड घोटाळ्यावरुन विरोधक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. नगरविकास मंत्री असताना मुख्यमंत्र्यांनी न्यासाची ८६ कोटींची जमीन बिल्डरांना अवघ्या २ कोटी रुपयात दिल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. यावर आता विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी भाष्य केलं आहे.

नागपुरात माध्यमांशी बोलताना अजित पवार म्हणाले की,



''मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर ज्या भूखंडाबाबत गैरव्यवहार झाल्याचा ठपका ठेवण्यात येत आहे, तो भूखंड घोटाळा सर्वात आधी भाजप नेत्यांनी समोर आणला होता. त्यांच्यातल्याच काही लोकांनी पीआयएल दाखल केली होती,'' असं पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले की, ''सत्ताधाऱ्यांची सहा महिन्यांपासून मुजोरी सुरू आहे.

सत्ताधाऱ्यांच्या तक्रारी उचलून धरल्या जातात तर विरोधकांच्या दाबल्या जातात. जयंत पाटील यांच्याबाबत पक्षांनी समंजस भूमिका घेतली पाहिजे. जयंत पाटलांनी अपशब्द वापरला नाही. जयंत पाटलांवरील कारवाई अयोग्य आहे,'' असा आरोपही त्यांनी सत्ताधाऱ्यांवर केला.

# शेतकरी का मरतोय?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये पाच वर्षांत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते. त्यांच्या कारभाराला आठ वर्षे पुरी झाली आहेत. या काळात चलनवाढीचा परिणाम सोडला तर किती शेतकऱ्यांचे उत्पन्न खरोखर दुप्पट झाले? आणि उत्पन्न दुप्पट होणारा कोणता शहाणा माणूस मग आत्महत्या करेल? काही महिन्यांपूर्वी एक पाहणी प्रकाशित झाली. तीत गेल्या पाच वर्षांत नगदी पिके घेणाऱ्या काही राज्यांतील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाल्याचे नमूद केले होते. विशेष म्हणजे, त्यात महाराष्ट्रातील ऊस व सोयाबीन शेतकरी होता. या पिकांतून येणारे उत्पन्न दुप्पट झाले, याचा अर्थ इतरही पिकांना त्या तुलनेत बरा भाव मिळायला हवा. मग देशात सर्वाधिक आत्महत्या करणारा शेतकरी महाराष्ट्राचा कसा आणि महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या करणारा विदर्भाचा कसा, हा प्रश्न सरकार, नोकरशाही, हजारो एनजीओज्, जातीपातींच्या लढाऊ संघटना आणि सकल मराठी समाजाला कसा पडत नाही? वर्षानुवर्षे वाढत जाणाऱ्या या आत्महत्यांची कुणालाच काही शरम वाटत नाही का? नव्याने जी आकडेवारी समोर आली आणि 'महाराष्ट्र टाइम्स'ने जो विशेष वृत्तान्त प्रकाशित केला; त्यानुसार महाराष्ट्रात नऊ महिन्यांत दोन हजार १३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यातील सर्वाधिक आत्महत्या विदर्भातील आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत मराठवाडा, पश्चिम व उत्तर महाराष्ट्रातील आत्महत्यांचा आकडाही वाढतो आहे. केवळ कोकण या संकटातून तूर्त तरी वाचतो आहे. हा वर दिलेला आकडा नीट पाहिला तर दररोज महाराष्ट्रात सरासरी दहापेक्षा जास्त शेतकरी आत्महत्या करीत आहेत, हे लक्षात येईल. या इतक्या गंभीर आणि मन हेलावून टाकणाऱ्या स्थितीचे सध्या नागपुरात चालू असणाऱ्या विधिमंडळाच्या अधिवेशनात नेमके काय प्रतिबिंब पडलेले आपल्याला दिसते? तेथे सभागृहांमध्ये आणि बाहेर प्रामुख्याने जे काही चालले आहे; त्याचा महाराष्ट्रावर रोज कोसळणाऱ्या या घोर संकटाचा काही संबंध आहे, असे नागरिकांना वाटते तरी आहे का? नागपूर ही राज्याची उपराजधानी. तेथे वर्षातील किमान एक तरी विधिमंडळ अधिवेशन घेण्यामागची संकल्पना विदर्भातील प्रश्नांची विशेषकरून चर्चा व्हावी, हीच होती. तसे होते आहे का? शेतकऱ्यांच्या आणि शेतमजुरांच्या आत्महत्या हा अर्थातच केवळ विदर्भापुरता मर्यादित विषय नाही. मात्र, वर्षानुवर्षे शेतकऱ्यांच्या आत्महत्या सर्वांत जास्त विदर्भातच होत आहेत. महाराष्ट्रातले जनजीवन आणि राजकारण या संकटाला इतके सरावले आहे की, या आत्महत्यांचे कोणाला काही वाटेनासेच झाले आहे. या संकटावर सारी शक्ती पणाला लावून मात करण्यासाठी लागणारी कल्पकता, उमेद आणि प्रामाणिक इच्छा सारे हरवून बसले आहेत. 'रोज मरे त्याला कोण रडे' ही म्हण महाराष्ट्राने आपल्याच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत अत्यंत निर्ममपणे वागून खरी करून दाखविली आहे. महाराष्ट्रातील आणि विशेषकरून विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची प्रमुख कारणे सर्वांना माहीत आहेत. वारंवारची सलग नापिकी, कर्जबाजारीपणा, सुका किंवा ओला दुष्काळ, अलीकडे अचानक पडणारा पाऊस, खते-बियाणे यांच्यात होणारी फसवणूक, प्रतिष्ठा पणाला लावून व कर्जे काढून होणारे महागडे विवाह, सावकारांकडून होणारा छळ, बाजारात अचानक कोसळणारे भाव आणि विमा कंपन्यांकडून सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमताने होणारी फसवणूक.. ही सारी कारणे सर्वांना माहीत आहेत. प्रामुख्याने राज्य आणि नंतर केंद्र सरकार याबाबत नेमके काय करते आहे, या यातला कळीचा प्रश्न आहे. महाराष्ट्र सरकार योजनांची, अनुदानांची, शेतीमाल खरेदीची आणि कर्जमाफीची आकडेवारी तोंडावर फेकायला कमी पडणार नाही. शेतकऱ्याच्या खात्यात कसे थेट पैसे जमा होतात, वगैरे जादू केल्याच्या थाटात पुन्हा पुन्हा सांगितले जाईल. मग आमचा शेतकरी रोजच्या रोज फास लावून का घेतो आणि विषाची बाटली का पितो, याचे उत्तर राज्य सरकार व नोकरशाहीने महाराष्ट्राला द्यायला हवे. सरकार हे की ते हा यातला प्रश्नच नाही. काल होते, परवा होते आणि आज आहेत; ते व हे सगळेच यात शेतकऱ्याचे गुन्हेगार आहेत. विधिमंडळाने बाकी सगळे कामकाज बाजूला ठेवून केवळ या विषयावर गंभीर चर्चा तर करायला हवीच; पण शेतकऱ्याशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध येणाऱ्या सर्व खात्यांचा 'सिंगल टार्गेट-एकलक्ष्यी कार्यगट' बनवायला हवा. आधुनिक व प्रगत राज्य आणि सर्वाधिक सामाजिक संघटना व कार्यकर्ते असणारा प्रदेश; हा महाराष्ट्राचा लौकिक उद्या जगातील या सर्वांत जीवघेण्या आत्महत्यासत्राची इतिहासकार नोंद घेतील, तेव्हा कुणालाही खरा वाटणार नाही. कोणताही शेतकरी किंवा शेतमजूर फास किंवा विष जवळ करण्यापूर्वी आधी मनाने मरत असतो. खरे बचावकार्य तेव्हाच करायचे असते. पण या प्राण सुकून मिटत जाणाऱ्या मनांपर्यंत जाण्याची, त्यांच्यात नवी उमेद पेरण्याची निकड महाराष्ट्रात उरली आहे कुणाला?

# पेण मधील आदिवासी महिलांची पिण्याच्या पाण्यासाठी वणवण

## बोरगाव पंचायत हद्दीतील उंबरमाळ आदिवासी वाडीसह इतर वाड्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई

**दै.रायगड नगरी । पेण**

एकीकडे भारत देश स्वातंत्र दिनाचा अमृत महोत्सवी वर्ष साजरा करत असला तरी अद्यापही देशातील जनतेच्या मूलभूत गरजा पाणी, रस्ते, वीज आदी सुविधा पोहोचल्या नसल्याचे दिसून येत आहे. जिथे अगोदरच मुबलक पिण्याचे पाणी आहे तिथेही लाखो-कोटी रुपयेचा निधी टाकून जलजीवन मिशन योजनेतून हरघर जल योजना राबविली जात आहे. मात्र असे अनेक गाव-वाड्या आहेत त्या गावकऱ्यांना पाण्यासाठी दुसऱ्या वाडीवर अथवा परिसरात जावं लागत. अशीच पेण तालुक्यांतील बोरगाव ग्रामपंचायत हद्दीतील उंबरमाळ आदिवासी वाडीसह इतर वाड्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असून आदिवासी महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. मिळेल त्या खड्ड्यांमधून पाणी भरावे लागत असल्याचे विदारक दृश्य सध्या पहायला मिळत आहे. त्यामुळे पहिल्यांदा ह्या टंचाईग्रस्थ वाडी-गावांत निधी टाकून पाण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

मुख्यतः पेण तालुक्यातील पाच आदिवासी वाडयांचा विकास खुंटला असून येथील वाड्यांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव आहे. बोरगाव ही आदर्श ग्राम पंचायत असताना या परिसरात असलेल्या उंबरमाळ आदिवासी वाडीतील आदिवासीना आजतागायत रस्ता नाही. शिवाय आदिवासी महिलांना पिण्यासाठीचे शुद्ध तर सोडाच पण पिण्यायोग्य पाणीही उपलब्ध नसून येथील महिलाना पिण्याचे पाण्यासाठी अनेक किलोमीटर अंतर भटकून गुराढोरांनी प्यायलेले अथवा जंगली प्राण्यांनी प्यायलेले पाणी मिळेल त्या खड्ड्यातून भरावे लागते.

आमची वाडी बोरगाव ग्रा.पं.मध्ये तात्पुरती असल्याचे आम्हाला वारंवार सांगितले जाते. त्यामुळे आम्हाला कोणत्याच सुविधा मिळत नाहीत. म्हणून आमच्या विकासासाठी तांबडी, काजूची वाडी, खऊसावाडी, केळीचीवाडी आणि उंबरमाळ या पाच वाड्यांची एक स्वतंत्र ग्रामपंचायत तयार करण्यात यावी अशी मागणी या आदिवासी वाडीतील आदिवासी करत असून आदिवासी ग्रामस्थ सुनिल वाघमारे, निलम वाघ, गीता वाघमारे, यशवंत वाघमारे, किसन पवार, दत्तू हिलम, शिमग्या हिलम, कृष्णा पवार, सतीश पवार, यमुना वाघमारे, कमळी हिलम शोभा हिलम, राजू हिलम संतोष हिलम, गोपीनाथ हिलम यांच्यासह इतर आदिवासी महिला-पुरुषांनी आपल्या अडीअडचणीं बाबत सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांची भेट घेऊन ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्यावतीने मुख्यतः पिण्याच्या पाण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती केली आहे.



# मुरूड समुद्रकिनारी आनंद मेळा आणि व्हेज- नॉनव्हेज फेस्टिव्हलला अभूतपूर्व प्रतिसाद; महिला मंचचा उपक्रम

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड तालुका महिला मंच तर्फे २४आणि २५ डिसेंबर रोजी मुरूड समुद्रकिनारी हिंदू बोर्डिंगच्या प्रांगणात आनंदमेळा अर्थात फूड फेस्टिव्हल चे आयोजन सकाळी ११ ते रात्री १० वाजेपर्यंत करण्यात आले होते.या उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. दोन दिवसात सुमारे १ हजार नागरिकांनी आनंद मेळाव्यात हजेरी लावली. मुरूड महिला मंचच्या सौ करिष्मा प्रतीक आंबूर्ले यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून आनंद मेळा आणि फेस्टिव्हल चे उदघाटन झाले.महिला मंचच्या सर्व भगिनींनी फेस्टिवल साठी उपस्थित राहून आणि परिश्रम घेऊन आनंदमेळा यशस्वी केला.



कोकणातील अस्सल चविष्ट विविध शाकाहारी- मांसाहरी पदार्थांची, लज्जत पर्यटकांना चाखायला मिळाली.त्याच बरोबर पुरण पोळी, पोपटी, चिकन कटलेट, वडे मटण, रंगडा पॅटिस, पाणी- पुरी, पाव भाजी, बटाटे वडे, मिसळ, चिकन बर्गर, भावनागरी शेव, चिवडा,मुखवास अशा अनेक पदार्थांची चव चाखायला मिळाली. विविध प्रकारचे मसाले, खरवस, पकोडे आदी उपलब्ध होते.या एकूणच मेजवानीवर उपस्थित पर्यटक आणि स्थानिक नागरिक बेहद्द खुश होते.शिवाय सौंदर्य प्रसाधने,कपडे, ज्वेलरी आदी विविध प्रकारचे रोहा, मुरूड, अलिबाग येथील सुमारे २३ ते २५ स्टॉल्स फेस्टिव्हल मध्ये लावण्यात आले होते. फूडफेस्टिव्हल मध्ये पर्यटकांनी आणि नागरिकांनी भेट दयावी असे आवाहन आयोजक मुरूड तालुका महिला मंचने केले होते.त्याला पर्यटक आणि नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. फेस्टिव्हल मध्ये सर्व धर्मीय स्थानिक पुरुष आणि महिलांची मोठी उपस्थिती लक्षवेधी होती. या फूडफेस्टिव्हल व आनंदमेळ्यात हिन्दू- मुस्लिम नागरिक आवर्जून उपस्थित होते.परंतु कुठेही वाद किंवा अनुचित प्रकार घडला नाही. सर्वानी एकमेकांना भेटताना एकमेकांची आपुलकीने विचारपूस करून आनंद घेतला.एक प्रकारे हिंदू- मुस्लिम आणि सर्व धर्मीय सौहार्द वाढीस लागल्याची भावना मुरूड मधील नागरिक विजय लखमदे,यांनी बोलताना व्यक्त केली दिसून येत होते.

# महापालिका मुख्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपायुक्त कल्पिता पिंपळे, सामान्य् प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, भांडार विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी व कर्मचारी उपस्थित होते.

# थंडीचा जोर वाढला, वाल पिक बहरला ; तलावात पान वेळीने घातले पांघरुण

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात थंडीचा जोर वाढत आहे. यामुळे रब्बी हंगामातील वाल,पावटा, चवळी, मूग हे पिक जोरात बहरु लागले आहे.त्यातच कळंबुसरे गावातील तलावात पान वेळीने पांघरुण घालण्यास सुरुवात केल्याचे सुंदर चित्र पहावयास मिळत आहे.

उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, पाणदिवे, नागाव, म्हातवली, केगाव गावातील शेतकरी रब्बी हंगामात आप आपल्या भात शेतीला जोडधंदा म्हणून वाल, पावटा, चवळी, मूग या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात करत आहेत. सदर पिकासाठी थंडी तील वातावरण हे पोषक असल्याने जसजसे थंडीचा जोर वाढत जातो तसतसे वाल, पावटा, चवळी, मूग या पिकाची रोपे बहरु लागतात. मागील चार दिवसा पासून थंडीचा जोर वाढत असल्याने शेतकरी सुखावला आहे. थंडीचा कडाका असाच वाढत राहीला तर रब्बी हंगामातील पीक मोठ्या प्रमाणात येईल असे मत शेतकरी हसुराम मोकल यांनी व्यक्त केले आहे.

त्यातच वाढत्या थंडीमुळे कळंबुसरे गावातील तलावात पान वेळी वाढत आहे. त्यामुळे संपूर्ण तलावात पान वेळीने सुंदर पांघरुण घातल्याचे चित्र नागरीकांच्या डोळ्याना भुरळ घालत आहे.



# अंजुमन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची कराटे चॅम्पियन्स विभागीय स्पर्धेत निवड

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेत चॅम्पियन्स कराटे क्लब तर्फे म्हसळा तालुक्यातून १४ खेळाडूनी सहभाग घेत कराटे चॅम्पियन होण्याचा बहुमान प्राप्त केला आहे.त्यापैकी अंजुमन हायस्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा च्या चार विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले. त्यामध्ये रुमाना इर्शाद खान, शिया शशिकांत तांबे, कुमार वर्हीरिकिराटे स्पर्धेत कु.विक्रांत विश्वास खांडेकर गोल्ड पदक,कु.आयुष सतिश शिगवण गोल्ड, कु.सहिल अशोक साळुंखे गोल्ड,कु,धृपाल भोमाराम कुमार आणि घनसार राफे फझल या विद्यार्थ्यांनी उज्वल यशसंपादन करून तालुक्याचे तसेच आपल्या विद्यालयाचे नाव उज्वल केले. विद्यार्थ्यानी आपल्या उत्तम खेळाचा प्रदर्शन करीत त्यांच्या गटांमध्ये खेळत अव्वल क्रमांक(सुवर्ण पदक)पटकावलेआहे. यशस्वी विद्यार्थ्यांची पुढील स्पर्धेसाठी धारावी येथील स्व.राजीव गांधी स्टेडियम,धारावी येथे होणाऱ्या मुंबई विभागीय कराटे स्पर्धे करीता निवड झाली आहे.आयोजीत स्पर्धेत कु. सोहेल शशिकांत तांबे (सिल्व्हर),कु.लयबा अखलाक मेमन (सिल्व्हर),कु.रुमाना इर्शाद खान (सिल्व्हर) पदक पटकावले.चॅम्पियन्स कराटे क्लब रायगड संघाकडून खेळताना म्हसळा संघा मधिल ९ विद्यार्थांनी गोल्ड,४ सिल्व्हर व १ ब्राँझ पदक पटकावले आहे. संपूर्ण स्पर्धेमध्ये चॅम्पियन्स कराटे क्लबचाच बोलबाला राहिला.म्हसळा,श्रीवर्धन व महाड तालुक्यातून एकूण २२ विद्यार्थी विभागासाठी सिलेक्ट झाले आहेत.सर्व विजेत्यांच्या यशा मागे चॅम्पियन्स कराटे क्लबचे संस्थापक शिहान संतोष मोहिते यांचे योग्य मार्गदर्शन लाभले.प्रशिक्षक म्हणुन सेंसेई अविनाश मोरे,प्रसाद सावंत,रितेश मुरकर,प्रसाद विचारे,अनिकेत साखरे,कृतार्थ कोलथरकर आणि अभय कळमकर यांनी चोख काम केले.सर्व यशस्वी स्पर्धाकांचे स्कूल कमिटी चेअरमन नासिर मिठागरे, हलका चेअरमन फझल हलडे, प्राचार्य महंमद तांबे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुच्छ देऊन अभिनंदन केले.

# नाईक-अंतुले महाविद्यालयाचे आगरवाडा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोकण उन्नती मित्र मंडळ मुंबई संचलित वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा यांच्या वार्षिक राष्ट्रीय सेवा योजना विशेष सात दिवशीय श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन म्हसळा तालुक्यातील मौजे आगरवाडा येथे १०० विद्यार्थी,कार्यक्रम अधिकारी प्रा.सुमित चव्हाण,प्रा.डॉ.संजय बेंद्रे यांच्या समवेत करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामधे आगरवाडा येथे सात दिवसाच्या काळात अंतर्गत परिसर विकास, क्रिडांगणाचे रक्षण, निरक्षरतेचे निर्मूलन, सामाजिक अनिष्ट चालीरीती आणि अंधश्रद्धा निर्मूलन, गलिच्छ वस्ती सुधारणा,ग्रामिण रस्ते तयार करणे, लघुसिंचन प्रकल्पास सहाय्य करणे, एड्स विरोधी जनजागृती, श्रमदान, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादि रचनात्मक कार्यात सर्व शिबिरार्थांनी योगदान देऊन शिबीर यशस्वी पार पाडले.

महाविद्यालयीन विकास समिती सदस्य महादेव पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेचे काम करतो म्हणजे आपण राष्ट्राचे काम करीत आहोत असे समजले पाहिजे.राष्ट्रीय सेवा योजनेमुळे आपल्याला नाती कसे जपावेत याची किंमत समजू लागते.आपल्याला संधी मिळवून देणे तसेच आपल्याला घडवणे हे देखील राष्ट्रीय सेवा योजना करीत असते.आणि ह्या योजनेमुळेच तुमी घडत असता. कॅम्पमुळे आपल्याला वास्तविक जीवनाची ओळख समजते.आणि ह्याच कॅम्पमुळे तुम्हाला एक नवीन ओळख मिळते व नवीन जीवनाची सुरवात झाली असे वाटू लागते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नाझीम चोगले यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले की, छौं ाश, र्लीों्ीें' माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंमसेवक तत्पर असतो. आपले उज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य आपण ह्या स्वरूपात करीत आहात.

शिबिराच्या सांगता समारंभ कार्यक्रमाला उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष नाजीम चोगले,महाविद्यालय विकास समिती सदस्य महादेव पाटील,समाजसेवक संतोष जाधव, महाविद्यालय प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे,माजी प्रभारी प्राचार्य एम.एस. जाधव,आगरवाडा ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष कानू नात्ती,उपाध्यक्ष अंकुश गाणेकर,सचिव लक्ष्मण गाणेकर,सहसचिव प्रकाश गाणेकर, उपसरपंच प्रकाश गाणेकर,मुंबई अध्यक्ष हरिश्चंद्र गाणेकर, गाव पाटील जनार्दन भायदे, महिला सचिव सुजाता नात्ती,तुकाराम भायदे,भानुदास गाणेकर, रामा गाणेकर, महादेव नात्ती,काशिनाथ भायदे, ग्रामस्थ, महिला मंडळ शिक्षकेत्तर कर्मचारी सुभाष साळवे,वैभव कळस उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी प्राचार्य प्राध्या.एम.एस.जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुमित चव्हाण ह्यांनी केले तर प्रा.जगदीश शिगवण यांनी उपस्थितांचे आभार मानले.निवासी शिबीर यशस्वी करण्याकरिता कार्यक्रम अधिकारी यांच्या समवेत श्रुती वेटकोळी,प्रा.डॉ.जगदीश शिगवण,अनिल बुधकर यांनी खूप मेहनत घेतली.



अजय सुनील पेठे यास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक : पेठे परिवार

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## क्रिकेट सामन्यात मुठवली खु.अ संघ ठरला अंतिम विजेता

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

शिव छत्रपती असोसिएशन मुठवली खु.ब ता.रोहा यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या विभागिय क्रिकेट स्पर्धेत मुठवली खु.अ संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम कामगिरी करून विजेतेपद पटकावले.

स्पर्धेचे उद्घाटन युवा कार्यकर्ते महेश तुपकर,सुनील शेळके,निलेश शिंदे,राजेंद्र शेळके यांच्या हस्ते करण्यात आले.तर स्पर्धेतील उपविजेतेपद जी.सी.सी.पिंगळसई या संघाने पटकावले.तर सोनगाव आणि पिंगळसई या संघांना अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेतील सामनावीर म्हणून शिवतेज शिंदे,उत्कृष्ट फलंदाज सुशांत शेटगे,उत्कृष्ट गोलंदाज- सनी जाधव तर उत्कृष्ट क्षेत्रक्षण अमृत सानप यांना सर्वश्री महेश तुपकर,तुळशीराम शेळके, सतीश ठाकुर, मारुती तुपकर आदी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देउन गौरविण्यात आले.यावेळी मंगेश तुपकर,चंद्रकांत, अविनाश शेळके, महेश शेळके, अनिकेत शेळके अनिकेत शेळके, शिंदे, शिवाजी शिंदे, दिनेश तुपकर, संदेश तुपकर, विशाल शिंदे, संजय तुपकर, विलास शेळके, वसंत शिंदे, प्रमोद ठमके, मुकेश शिंदे, रवींद्र शिंदे, नामदेव शिंदे,राकेश शेळके, संतोष भोसले, मंगेश शेळके, आकेश शेळके, नरेश तुपकर, परेश ठमके आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मुठवली खु.ब व ग्रामस्थ मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

## महिलेस धक्का मारून सोनसाखळी हिसकावून दुकली पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पायी जात असलेल्या एका महिलेस मोटारसायकल वरून आलेल्या दोघांपैकी एका इसमाने त्यांना धक्का मारून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून पसार झाल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे.

कळंबोली येथील करावली चौकात हेलन नाडार या पायी जात असताना दुचाकीस्वाराने त्यांना धक्का मारला त्यानंतर दुचाकीवरील एकाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची सोनसाखळी हिसकावून ते पसार झाले.

# काशी येथे मूळ वैश्य कुलगुरू मठाच्या पुनर्निर्माणसाठी शांकर एकात्मता पदयात्रा

## कळंबोलीत करण्यात आले भव्य स्वागत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वैश्य गुरू श्री श्री वामनाश्रम महास्वामीजींनी कर्नाटकातील कालडी ते काशी (वाराणशी) पर्यंत शांकर एकात्मता पदयात्रेचे नियोजन केले आहे. पदयात्रेच्या निमित्ताने त्यांचे रायगड जिल्ह्यात आठवडाभर वास्तव्य होते. त्यांच्या या पदयात्रेत कोंकणसह रायगड जिल्ह्यातील असंख्य भाविक सहभागी होत आहेत. या पदयात्रेला त्यांनी कर्नाटक कालडीहून विजयादशमीच्या दिवशी (५ सप्टेंबर) प्रारंभ केला असून, ते अक्षय तृतीया (२३ एप्रिल) ला काशी येथे पोहोचणार आ-हेत. सर्वांनी या महान कार्यात सहभागी होऊन तन-मन-धनाने सेवा अर्पण करावी, असे स्पष्ट प्रतिपादन वामनाश्रम महास्वामींनी केले आहे. २६ डिसेंबर आणि २७ डिसेंबर रोजी वामनाश्रम महास्वामींचे कळंबोली येथे स्वागत करण्यात आले. यावेळी अनेक वैश्य बांधव उपस्थित होते. वामन आश्रम स्वामींनी संपूर्ण वैश्य समाजाचे गत पूर्ववैभव पुन्हा आणण्याच्या उद्देशाने महापुण्यक्षेत्र काशी येथे मूळ वैश्य गुरुमठ पुनर्निर्माणचा महा संकल्प केलेला आहे.

रायगड जिल्ह्यात या पदयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. कळंबोली येथे वामनाश्रम महास्वामींनी प्रत्येक ठिकाणी वास्तव्यात असताना प्रवचनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून चंद्रमौळी देवतांची पूजा आणि अन्य धार्मिक कार्यक्रम झाले. याप्रसंगी असंख्य भाविक, भक्तांची उपस्थिती होती. संपूर्ण वैश्य समाज केरळ, कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र इत्यादी राज्यात पसरलेला आहे. या समाजाचा कुलगुरू मठ हळदीपूर येथे आहे. या मठात अनेक कार्यांना एक-एक करून रुवात झाली आहे. त्यानंतर सुमारे एकशे दहा वर्षे खंडित झालेली गुरुपरंपरा आरंभ करण्यासाठी श्री श्री वामनाश्रम महास्वामीजींचा योग्य गुरू बटू म्हणून शोध झाल्यावर १९९३ ते २००४ पर्यंत त्यांना शृंगेरी जगद्गुरू श्री श्री भारतीतीर्थ महास्वामीजींच्या सानिध्यात धार्मिक व आध्यात्मिक शिक्षण प्राप्त झाले व त्यांच्याच कृपाशीर्वादाने २००४ साली हळदीपूर गुरुमठात गुरुपट्टाअभिषेकाने गुरुपरंपरा पुन्हा सुरू झाली व मठाचे सर्व कार्यक्रम शास्त्रोक्त पद्धतीने पुन्हा सुरू झाले. मठात दर वर्षी ब्रहारथोत्सव थाटात संपन्न होतो.

कालडीपासून काशीपर्यंत सुरू केलेली पदयात्रा फार महान व कठीण काम आहे, असे अनेक जणांचे मत होते. असे असताना प्रतिसादरूपात काशी येथे मोठी जागा घेऊन मूळ गुरूमठ निर्माण करणे हे मोठे कठीण कार्य आहे, पण हे कार्य करण्याचा संकल्प केला असून, पदयात्रा सुरू केली. कळंबोलीत या पदयात्रेचे भव्य स्वागत करण्यात आले. पुढे ही पदयात्रा ठाणे जिल्ह्यात प्रवेश करणार आहे.



## चौकचे पत्रकार जनार्दन भरतूक स्मृती राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**दै.रायगड नगरी । चौक**

चौकचे ज्येष्ठ पत्रकार जनार्दन भरतुक स्मृती राज्यस्तरीय खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन नेत-ाजी पालकर मंडळ, चौक तर्फे स्वराज्याच्या अमृत महोत्सवाच्या औचित्य साधून केले आहे.

स्पर्धकांनी स्वतंत्र लढ्यातील सिद्धगडचे हुतात्मे भाई कोतवाल व हिराजी पाटील या विषयावर पंधराशे शब्द पर्यंत मराठी भाषेत निबंध लिहून तो २६ जानेवारी २०२३ पर्यंत पाठविण्याचा आहे.

एक ते पाच विजेत्यांना रुपये एक हजार,रुपये ७५०. रुपये, पाचशे. रुपये चारशे. रुपये ३००.ची पुस्तक रूपाने बक्षीस, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र सह दिले जाणार आहेत. स्पर्धकांनी आपले निबंध संदर्भासह स्वतःच्या माहितीच्या कागदासह अनिल भरतुक, चौक. अभिजीत चौधरी ग्रंथपाल चौक, अशोक मोरे, शिरवली ( पो. रानसई पेण ). स उज्वला दिघे अध्यक्ष को.मा.स. प. लक्ष्मी नगर खोपोली. प्रा. सर्प्रिया सकपाळ, सि. के. टी. क. महाविद्यालय नवीन पनवेल. सौ रुपाली सकपाळ, (गोसाळवाडी) पो.पोयजे. यांच्याकडे पाठवावेत असे आवाहन संघटक रायगड भूषण यशवंत सकपाळ चौक. भूषण पिंगळे, विठ्ठल नगर कर्जत यांनी पत्रकाद्वारे केले आहे

## आश्रमशाळेत जनजाती क्रांतिकारक हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे शानदार अनावरण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र केंद्र तालुका माणगांव जिल्हा रायगड आश्रमशाळा उतेखोल, माणगांव येथे २६ डिसेंबर हा कल्याण आश्रमाच्या स्थापना दिनानिमीत्ताने तसेच यावर्षी आपण स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करत आहोत या अमृत महोत्सवांमध्ये माणगांव मधील कल्याण आश्रमाच्या विजया गोपाळ गांधी अनुदानित आश्रम शाळेत जनजाती क्रांतिकारक हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या पूर्णाकृती पुतळा व भारत मातेचे शिल्प, सरस्वती मंदिर व नव्याने बांधण्यात आलेल्या भव्य सभागृहाचे उद्घाटन अनावरण सोहळा रामचंद्रजी खराडी - राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम, विष्णुजी सुरूम - प्रांताध्यक्ष वनवासी कल्याण आश्रम कोकण, ठमाताई पवार - अध्यक्ष संकुल समिती आश्रम शाळा माणगांव, प्रकल्प अधिकारी ए.आ.वि. प्र. पेण श्रीमती शशिकला अहिरराव, तसेच माणगांव नगरीचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमास वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांत सचिव - महेश देशपांडे, अध्यक्ष शालेय समिती आश्रम शाळा माणगाव - महादेव जाधव तसेच अनेक दानशूर मान्यवर मंडळी व आश्रम शाळेचे साडेचारशे विद्यार्थी व अनेक माजी विद्यार्थी, सर्व शिक्षक, कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना चहापान व भोजनाची सुनियोजीत सोय देखील करण्यात आली. शाळेच्या भव्य परिसरात क्रांतिकारी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांचा पुर्णाकृती पुतळा व भारत मातेचे भव्य शिल्प व सरस्वती मंदिर झाल्याने आश्रम शाळेचे ते आता खास आकर्षण ठरणार हे निश्चित. या देखण्या कार्यक्रमास जिल्हातुन व बाहेरुन लोकांची व आश्रम शाळेच्या साडेचारशे विद्यार्थी, सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांची लक्षणिय उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना चहापान व भोजनाची सुनियोजीत सोय देखील करण्यात आली. शाळेच्या भव्य परिसरात पहिल्यांदाच क्रांतिकारी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा, भारत मातेचे भव्य शिल्प व सरस्वती मंदिर हे आश्रम शाळेचे खास आकर्षण ठरणार.



## कृषी विस्तार कार्यक्रमांतर्गत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय व स्वदेस फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील ७ तालुक्यांमधील शेतकऱ्यांचा विकास करण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, रायगड व स्वदेस फाउंडेशन यांच्यात कृषी विकास कार्यक्रमांतर्गत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. सामंजस्य करारावर स्वदेस फाउंडेशनच्या संस्थापक झरीना स्क्रूवाला व प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले यांनी स्वाक्षरी केल्या.

यावेळी उपसंचालक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय काळभोर, उपसंचालक आत्मा तथा नोडल अधिकारी (स्मार्ट) सतीश बोऱ्हाडे आणि पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ, जिल्हा अंमलबजावणी कक्ष ( स्मार्ट) भाऊसाहेब गावडे, स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे, संचालक प्रदीप साठे, उपसंचालक तुषार इनामदार, नीता हरमलकर, महाव्यवस्थापक प्रसाद पाटील, अफशान शेख उपस्थित होते.



सामंजस्य करारांतर्गत रायगड जिल्ह्यामध्ये स्वदेस फाउंडेशन काम करीत असलेल्या गावांमध्ये तीन वर्षांमध्ये पोलादपूर , महाड, माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन व सुधागड तालुक्यामधील शेतकऱ्यांसाठी कृषी विस्तार कार्यक्रमांतर्गत मँगो नेट नोंदणी, मँगो जीआय नोंदणी, शेतकरी कंपनीची स्थापना, शेतकरी गट निर्मिती, प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग योजना प्रकल्प अंमलबजावणी, स्मार्ट प्रकल्प अंतर्गत शेतकऱ्यांना लाभ, बांबू विलेज निर्मिती, किसान क्रेडिट कार्ड नोंदणी व लाभ, सौर ऊर्जा कुंपण लाभ, प्रधानमंत्री पिक विमा योजना लाभ व शेतकऱ्यांना विविध प्रशिक्षण या विषयांवर स्वदेस फाउंडेशन व कृषी विभाग एकत्रितपणे समन्वयाने काम करणार आहेत. सामंजस्य कराराचा लाभ स्वदेस फाउंडेशन अंतर्गत असणाऱ्या स्वप्नातील गावांमधील शेतकऱ्यांना होणार असून कृषी विभागाच्या योजना जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी स्वदेस फाउंडेशन व कृषी विभाग प्रयत्न करेल असे मत स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे यांनी सामंजस्य करार कार्यक्रमादरम्यान केले. सामंजस्य करारामुळे रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी स्वदेस फाउंडेशन सोबत कृषी विभाग एकत्रितपणे काम करेल, असे नमूद करून कृषी विभागाच्या योजनांचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या शेवटी स्वदेश फाऊंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार यांनी आभार मानले.

## टेम्पोतून गो मांसाची वाहतूक करणाऱ्या दोघांवर पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टेम्पोतून गो मांसाची वाहतूक करणाऱ्यांवर पोलिसांनी खारघर टोलनाक्या जवळ कारवाई केली आहे. टोल नाक्यावर रविवारी २ टन गोमासाने भरलेला पिकअप टेम्पो ताब्यात घेण्यात आला आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात चालक नागनाथ चनप्पा नागेशी व फैमीद कुरेशी याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारा संशयास्पद पिकअप टेम्पो खालापूरजवळ पशु मित्र प्रतीक ननावरे व महेंद्र पवार यांच्या निदर्शनास आला. यावेळी वाहनातून रक्त बाहेर सांडत असल्याचे त्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ नवी मुंबई पोलिसांच्या हेल्प लाईन नंबरवर ही माहिती दिली. तोपर्यंत ही गाडी खारघर टोलनाक्यावर पोहोचली होती. त्यानंतर या गाडीचा पाठलाग करत ही गाडी थांबवल्यानंतर पशुमित्रांनी वाहनचालकाला गाडीत काय आहे, असे विचारले असता चालकाने भाजीची वाहतूक करत असल्याचे त्याने सांगितले. मात्र गाडीची तपासणी केली असता त्यामध्ये गो मांस आढळून आले. हे मांस गोवंडी येथे नेले जात असल्याचे सांगितले. एकूण २ लाख किंमत असलेल्या गोमासाची भाजीच्या वाहनातून तस्करी होत असल्याचे समोर आले. पोलिसांनी पशुमित्रांच्या मदतीने ही कारवाई केली.



## प्रेम लक्ष चॅरिटेबल संचलित प्रेमा लक्ष्मण विद्यालय शाळेचा १८ वा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**दै.रायगड नगरी । माथेरान**

प्रेम लक्ष चॅरिटेबल ट्रस्ट संचलित प्रेमा लक्ष्मण विद्यालय शाळेचे आठरावे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा स्वराज्य जननी जिजामाता उद्यान पेणकर पाडा येथे उत्साहात झाला.यामध्ये कोळीगीत, गणेशवंदना, गुजराती गरबा, गोंधळ गीत,स्त्री -भ्रूण हत्या या विषयावर नाट्य प्रदर्शन करीत मल्लखांब प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास शाळेचे संस्थापक अध्यक्ष हरेश गावंड, माजी सैनिक जी. बी. सिंग, कर्नल नागेंद्र कुमार गुप्ताजी, वीर पत्नी प्रतिभा सुधाकर भट, मीरा भाईंदर सुपुत्र कौस्तुभ राणे यांचे पिता प्रकाशकुमार राणे , मातोश्री ज्योती राणे, शिवसेना जिल्हाध्यक्ष प्रभाकर म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरुण कदम, निर्बादेवी युवा मित्र मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण कांदळगावकर, महाकाली पतसंस्था अध्यक्ष लक्ष्मण पाटील, महाराष्ट्र प्रदेश असंघटित कामगार काँग्रेस चे सेक्रेटरी नवनाथ पवार यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.या दरम्यान सामजिक राजकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली होती.

शाळेच्या क्रीडा महोत्सवामध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा शाळेच्या सीईओ मंजीत कौर यांनी सत्कार केला.जिल्ह-ास्तरावर खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा शाळेचे कार्याध्यक्ष दिपेश गावंड यांनी सत्कार केला व खेळात आणखी पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले.शाळेच्या संचालिका नंदाताई गावंड यांनी एस एस सी बोर्डात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला करुन शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## गावठी दारूसह देशी दारूचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातून गावठी दारूसह देशी दारूचा साठा पनवेल शहर पोलिसांनी हस्तगत करत त्यांच्या विरोधात कारवाई केली आहे. कुडावे येथील किराणा मालाच्या दुकानात बेकायदेशीररित्या देशी दारूचा साठा करून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सदर ठिकाणी छापा टाकुन ९८० रुपये किमतीच्या १८ बाटल्या हस्तगत केला.

तर दुसऱ्या घटनेत सोमाटणे कातकरवाडी येथून एका इसमाकडून १० लिटर गावठी दारूचा साठा ज्याची किंमत १ हजार २०० रुपये इतकी आहे तो सुद्धा हस्तगत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे करंजाडे येथे किराणा मालाच्या दुकानात छापा टाकून ८३० रुपये किमतीच्या १८ बाटल्या हस्तगत केल्या आहे. अशाप्रकारे तालुक्यात तीन वेगवेगळ्या ठिकाणी पनवेल शहर पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

## पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात आढळला महिलेचा मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातील लोकल लाईनचे समोरील मोकळ्या जागेत कट्टयाचे बाजूस अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस तिच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

सदर महिलेचे अंदाजे वय ४२ वर्षे असून तिची उंची ४ फूट ८ इंच, अंगाने - सडपातळ, रंग- काळीसावळी, डोकीचे केस- बारीक काळे, दात- शाबूत, नाक - बसके, अंगात - जांभळया रंगाचा व सफेद रंगाचे फुलाचे डिझाईन असलेला गाऊन असा अंगावर आहे. या महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२-२७४६७१२२ किंवा पोलीस निरीक्षक प्रकाश होवाळ यांच्याशी संपर्क साधावा.


### नावात बदल

मी खाली सही करणार **सौ.विशाखा विलास हुदार (लग्नानंतरचे नाव)**, रा.मु.नांदगांव, पो.पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ वरील ठिकाणी राहत असून माझा विवाह श्री.विलास बाळकृष्ण हुदार यांच्या सोबत झालेला आहे. माझे लग्नापूर्वी कु.कांचन नारायण म्हात्रे हे नाव होते. तरी मी मे.कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर प्रतिज्ञापत्र करून मी माझ्या नावात बदल केला आहे. **सौ.विशाखा विलास हुदार (लग्नानंतरचे नाव)** व **कु.कांचन नारायण म्हात्रे (लग्नापूर्वीचे नाव)** या नावाच्या दोन्ही एकच व्यक्ती आहेत. हे मी या नोटीसीद्वारे जाहीर करत आहे. आणि यापुढे मी **सौ.विशाखा विलास हुदार** या नावाने ओळखली जाईल.

**नवीन नावाने सही/-**
**सौ.विशाखा विलास हुदार**


## रिटघर गावात आला रानगवा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील रिटघर गावात जंगलातील रानगवा आल्याने नागरिक भयभीत झाले. याबाबतची माहिती येथील पोलीस पाटील दीपक पाटील यांनी वन विभागाला दिली. गावामध्ये रानगवा शिरल्याने या रानगव्याला पाहण्यासाठी नागरिकांची एकच गर्दी उडाली. मात्र हा रानगवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी धावत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. अखेर या रानगव्याला हुसकावून दुसऱ्या दिशेला पाठवण्यात आले.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई**
**निविदा सूचना क्र.११ सन २०२२-२३**

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई ४००६१४, (दूरध्वनी क्र.०२२-२७५७१५३४) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

**कामाचे नाव :- रायगड जिल्हाधिकारी निवासस्थानाच्या बाजूस असलेल्या क्लब हाऊसच्या मागील बाजूस समुद्र धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे मजबुतीकरण करणे, ता.अलिबाग, जि.रायगड (भाग-१)**
**अंदाजित रक्कम रु.१९,२२,०४१/-**

टिप :- ई-निविदेची संपूर्ण माहिती खाली नमूद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच सदर निविदा सुचनेत काहीही बदल / सुधारणा करावयाची असल्यास शुद्धीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये खाली नमूद केलेल्या संकेत स्थळावर कळविण्यात येईल.

http://mahatenders.gov.in / https://mahapwd.com

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- **दि.२८/१२/२०२२ ते ०४/०१/२०२३**
निविदा उघडण्याचा कालावधी :- **दि.०५/०१/२०२३ दु.१५.०५ वा.**

जा.क्र.पअउ/निविदा/२०६०/२०२२
पत्तन अभियंता यांचे कार्यालय
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई-४००६१४
दिनांक : २२/१२/२०२२

**सही/-**
**पत्तन अभियंता,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),**
**कोंकण भवन, नवी मुंबई**
क्र.आरओसी-२०२२-२३/क्र.५/सी ५०११

# संक्षिप्त...

## अवचितगड प्रतिष्ठान वतीने नाताळ सणानिमित्त रा.जि.प.रेवोली शाळेत ओळखपत्र व खाऊचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील अवचितगड प्रतिष्ठानच्या वतीने संस्थापक अध्यक्ष उदय मोरे यांनी नाताळ सणाचे अवचित्य साधून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रेवोली व अंगणवाडी शाळा रेव–ोली या शाळेतील मुला मुलींना ओळखपत्र शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. सदर साहित्य वाटपाचा कार्यक्रम रोहा पंचायत समितीचे माजी सभापती लक्ष्मणराव महाले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. गेली तीन वर्ष हा उपक्रम अवचित गड प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रायगड भूषण पत्रकार उदय मोरे सेवानिवृत्त रायगड जिल्हा परिषद चे कार्यकारी अभियंता के. वाय. बारदेस्कर यांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविला जातो. अवचितगड प्रतिष्ठानच्या सामाजिक शैक्षणिक कार्याचे कौतुक करून ग्रामीण भागातील मुलामुलींना शैक्षणिक उत्साह निर्माण करण्याचा हा चांगला प्रयत्न आहे, असे माजी सभापती लक्ष्मणराव महाले म्हणाले. मुलांमध्ये शिक्षणाबद्दल आवड व जन जागृती निर्माण व्हावी या हेतूने अवचितगड प्रतिष्ठान ने सामाजिक बांधिलकी जपत अल्पशः प्रयत्न केला आहे. सदर कार्यक्रम शाळा व्यवस्थापन समिती व पालक संघाच्या अध्यक्षा प्रांजली प्रमोद शेलार, ग्रामपंचायत सदस्या नम्रता महाले, ललिता तुकाराम घरट, चैतन्य चेतन महाले नीता सुनील पवार, सलोनी सत्यवान भोईर, केंद्रप्रमुख खालापकर सर अंगणवाडी सेविका जयश्री जयंता गोवर्धने, मुख्याध्यापिका मनीषा उदय मोरे शिक्षक प्रतिनिधी शिल्पा गणेश दुधबर्वे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा उपक्रम राबविल्याबद्दल शाळेच्यावतीने अवचितगडचे अध्यक्ष उदय मोरे सरचिटणीस हरेश राम कापसे रायगड जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता के. वाय. बारदेशकर यांना धन्यवाद देण्यात आले. आभार मुख्याध्यापिका मनिशा उदय मोरे यांनी मानले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# अलिबाग तालुक्यातील को.ए.सो च्या ना.ना.पाटील हायस्कूल पोयनाडने दिल्लीत उंचावली महाराष्ट्राची मान

## ना.ना पाटील हायस्कूलच्या एन.सी.सी.कॅडेट्सची प्रजासत्ताक दिनाच्या राजपथवरील परेडसाठी निवड

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दिल्लीत दि.२६ जानेवारी रोजी राजपथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सहभागी व्हावे, असे अनेक कॅडेट्सचे स्वप्न असते. एन.सी.सी.मध्ये रिपब्लिकन डे परेड अर्थात आर. डी परेड ही अत्यंत मानाची समजली जाते. या आर.डी.परेडसाठी रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील को.ए.सो.ना.ना. पाटील हायस्कूल मधील सार्जंट जय महेश पाटील व कॅडेट गौरव दत्तेश डिंगणकर या दोन कॅडेट्सची निवड झाली आहे.

या कॅडेट्सने औरंगाबाद येथे झालेल्या एक भारत श्रेष्ठ भारत या देशपातळीवरील शिबिरामध्ये सांस्कृतिक सादरीकरणामध्ये सूवर्णपदक मिळविले होते. त्यानंतर त्यांना पुणे येथे होणाऱ्या आर.डी.परेड पूर्वतयारी शिबिर निवड प्रक्रियेसाठी बोलाविण्यात आले. त्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण ११६ कॅडेट्सची निवड करण्यात आली. यात ज्युनिअर डिव्हिजनच्या ३५ कॅडेट्सची निवड झाली असून त्यातील दोन कॅडेट्स रायगड जिल्ह्याचे आहेत.

या कॅडेट्सना शाळेचे अधिकारी श्री. समाधान शिवाजी भंडारे यांनी मार्गदर्शन केले. तसेच ६–महाराष्ट्र बटालियनचे कमांडंट कर्नल मनीष अवस्थी व त्यांच्या सर्व परेड मार्गदर्शक स्टाफने कॅडेट्सना मोलाचे मार्गदर्शन केले.

या परेडमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थी प्रचंड मेहनत करतात. एन.सी.सी च्या विविध चाचण्यांतून विद्यार्थ्यांची आर.डी परेडसाठी निवड केली जाते. १ जानेवारी ते ३० जानेवारी या कालावधीत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची दिल्लीत राहण्याची व्यवस्था केली जाते. या कालावधीत या विद्यार्थ्यांचा कसून सराव करून घेतला जातो. या दरम्यानचा संपूर्ण खर्च केंद्र शासनातर्फे केला जातो.

आर.डी.चे संचलन राजपथ मार्गाद्वारे रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत केले जाते. भारताच्या तिन्ही प्रकारांतील सैन्य म्हणजेच नौदल, पायदळ आणि वायुसेना, वेगवेगळे सेना विभाग, घोडदळ, पायदळ अद्ययावत शस्त्रांसह राजपथावरुन दिमाखात संचलन करतात. या संचलनाच्या सादरीकरणासाठीची पूर्वतयारी खूप काळजीपूर्वक आणि शिस्तीने केली जाते. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या उपस्थितीत १९५० ला राजपथावर पहिल्या संचलनाचे आयोजन करण्यात आले होते.

को.ए.सो.चे जेष्ठ संचालक तसेच शाळा समितीचे सभापती पंडित शेठ पाटील यांनी या कॅडेट्सचे व मार्गदर्शक शिक्षकांचे तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री.के.के.फडतरे, शाळेचे सत्र प्रमुख श्री.शशी पाटील, सौ.पिळवणकर, सौ. खरसंबळे, इतर सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

# माथेरानमध्ये वृक्ष तोडीवर वनखात्याचे बारकाईने लक्ष

**दै.रायगड नगरी । माथेरान**

निसर्ग सौंदर्याने नटलेल्या आणि चोहोबाजूंनी घनदाट जंगलाने व्यापलेल्या माथेरान मध्ये मागील काही वर्षांपूर्वी इथे नवीन हॉटेल्सची निर्मिती झाली त्यावेळी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली होती. त्यामुळे इथल्या पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी इथे नव्याने कार्यभार स्वीकारून वनपाल आर. आडे यांनी स्वतः जातीने लक्ष केंद्रित करून आपल्या सहकाऱ्यांसोबत संपूर्ण माथेरानचा परिसर अक्षरशः पिंजून काढत आहेत. त्यामुळे सध्यातरी त्यांच्या कार्यकाळात वृक्षतोड प्रकरणास आळा बसला आहे. येथील जुन्या बंगल्याचे आलिशान हॉटेलमध्ये रूपांतर होत असल्याने त्या सेट व्हीला या बंगल्यात सुध्दा स्वतः जाऊन त्यांनी पाहणी केली आहे. त्याठिकाणी खरोखरच वृक्षतोड झाली आहे किंवा कसे याबाबत आढावा घेतला आहे. आणि त्याठिकाणी सध्यातरी ५२६ झाडे हयात दिसत आहेत असे त्यांनी सांगितले. एकंदरीत माथेरानचे पर्यावरण अबाधित राहावे इथली वनराई अधिकाधिक जोमाने वाढावी यासाठी जंगल भागातील रस्त्यालगत तारेचे कुंपण केल्यास जंगलात कुणी वृक्षतोड करण्यासाठी शिरकाव करणार नाही आणि यामुळे पावसाळ्यात झाडे मोठ्या प्रमाणावर वाढून हे पर्यटनस्थळ हरित आणि थंड वातावरणात दिसेल यासाठी वनखात्याने लक्ष केंद्रित केले आहे. ज्या ठिकाणी काही होटेल धारकांनी वनखात्याच्या जागेत अतिक्रमण केलेले आहे किंवा वनखात्याच्या जागेचा वापर होत असेल त्या जागा वनखाते आपल्या ताब्यात घेऊन त्या जागेचे सुशोभीकरण लवकरच केले जाणार आहे. याहीवर्षी पावसाळ्यात चांगल्या प्रकारे वृक्षारोपण करून त्या रोपांची निगा राखली जाणार आहे.असेही वनपाल आर. आडे यांनी सांगितले.



# अपघाती जखमी वासराची सुश्रुषा; डॉ.गौरी उभारे व प्रसाद खरे यांची भुतदया

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

निजामपूर रोड येथील आईस फॅक्टरी जवळ सोमवार दि.२६ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजताचे सुमारास एका अज्ञात वाहनाने रस्त्याच्या मधोमध बसलेल्या एका गाईच्या वासराला आपल्या वाहना समोर आल्याने त्याला चुकविताना धडक लागुन गाडीचे चाक त्याच्या पायावरुन गेले असावे परंतु वासराला लागल्याने ते रस्त्यातच कोलमडुन बसलेले पाहताच, येथील पौराहित्य करणारे सामाजिक युवा कार्यकर्ते प्रसाद खरे हे धावुन आले. त्यांनी या वासराला उठविण्याचा प्रयत्न केला परंतु पायाला मार व जखम झाल्याने रक्त वाहत होते. त्याला उठविणे कठीण म्हणुन प्रसाद यांनी रस्त्यावरुन जाणारा एक मित्र संतोषला मदतीस घेऊन वासराचे पायाला हळद पट्टी बांधुन उभे करण्याचा प्रयत्न केला.

परंतु ते जागेवरुन उठेना म्हणुन प्रसाद खरे यांनी त्यांचे ओळखीचे शासकिय पशुवैद्य यांचेशी संपर्क केला परंतु ते तात्काळ येणे अशक्य असल्याने प्रसाद यांनी लगेच माणगांव येथील युवा व्हेटर्नरी ( पशु वेद्यकिय ) डॉक्टर गौरी उभारे यांना मोबाईल फोनवरुन ही घटना सांगताच, त्या फोन घेताच तत्काळ या ठिकाणी येवून त्या वासराला विनामुल्य योग्य ते उपचार केल्या बद्दल त्यांचे प्रसाद खरे यांनी मनापासुन आभार व्यक्त केले आहेत. आपण समाजात वावरताना कुठेही अपघाती घटना दिसली तर धावुन जाणे हे आपले कर्तव्य समजतो परंतु अपघाती पशु–पक्षी कुत्रा, मांजर एखादा प्राणी असेल तर अनेक वेळेस आपण दुर्लक्ष करतो तेवढ्या तत्परतेने धावुन जात नाही असे प्रसंग अलिकडे अनुभवास येतात.

महाराष्ट्रात जेवढे संत झाले त्या सर्वांनी एकच सांगितले की, जो कोणी पशु पक्षी व प्राणी यांना नियमित अन्नदान व जलदान देईल, त्यांचे प्राण वाचवेल, जो कोणी पाण्यातील माशांना अन्नदान करेल व जो कोणी झाडे लावुन त्यांना जगवेल. त्याच्या संकटामध्ये आम्ही नक्कीच धावुन येऊ, यालाच भुतदया म्हणतात. मुक्या प्राण्यांवर प्रेम करणे आणि त्यांना दयाबुद्धीने वागविणे हीच परमेश्वराची खरीखुरी भक्ती होय. आपल्या आसपास अनेक पशु पक्षी व प्राणी रहातात. आपण माणूस म्हणून जन्माला आलो. सर्व प्राण्यांमध्ये माणूस हा सर्वश्रेष्ठ प्राणी,त्याने आपल्या बुद्धीच्या जोरावर खुप प्रगती केली आहे.

प्रत्येक माणसाने त्याच्या कमाईतील काही भाग पशुपक्षी व प्राणी यांना अन्नदान, जलदान करण्यासाठी खर्च करावा. असे सर्वच संत व महात्मा यांनी सांगितले आहे. संत एकनाथ महाराज यांनी तर चक्क काशी वरून आणलेल्या गंगेचे पाणी रस्त्यावर तहानेने व्याकुळ झालेल्या गाढवाला पाजले आणि तेथेच देव प्रगट झाला. श्रध्दा अंधश्रध्देचा भाग वगळता प्रत्येक माणस–ाने पशु पक्षी व प्राणी यांचे प्राण वाचवावे. हे सर्वश्रेष्ठ पुण्य आहे हेच या छोट्याशा प्रसंगावरुन आपल्याला दिसुन येत आहे.

# आसरे बौद्धवाडी येथील हटवलेली मुतारी पुन्हा बांधून देऊन संबंधित इसमावर कारवाई करा

## ग्रामस्थांचे पाली तहसीलदारांना निवेदन



**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

सुधागड तालुक्यातील आसरे बौद्धवाडी येथील मुतारी एका फार्महाऊस मालकाने हटवली आहे. त्यामुळे हटवलेली मुतारी पुन्हा बांधून देऊन संबंधित इसमावर कारवाई करावी अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली असून सोमवारी (ता.२६) या संबंधीचे निवेदन पाली–सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार यांना दिले. व कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला.

ग्रामस्थांनी आपल्या निवेदनात म्हंटले आहे की आमच्या गावातील दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत गावासाठी ग्रामपंचायतीने सार्वजनिक मुतारीचे बांधकाम २५ ते ३० वर्षांपूर्वी केले होते. सदर मुतारीचे नैसर्गिक आपत्तीत नुकसान झाले असता ती नादुरुस्त झाली होती. मुतारी नादुरुस्त असल्याकारणाने गावात आ–लेले पाहुणे व ग्रामस्थांची गैरसोय होत होती. म्हणून नादुरुस्त झालेली मुतारी आम्ही ग्रामस्थ स्वखर्चाने दुरुस्त करणार होतो. परंतु सदर मुतारीचे बांधकाम गावालगत असलेल्या फार्महाउस चे मालक प्रदीप ओक यांनी त्यांना त्यांच्या जागेत जाण्याकरिता रस्ता बनविण्यासाठी बेकायदेशीरपणे तोडले आहे. ग्रामस्थांनी विचारणा केली असता त्यांनी मी तहसीलदार पाली यांच्याकडून व ग्रामपंचायतकडून परवानगी आणली असून मी ही मुतारी तोडणार आहे. मला जर तुम्ही अडवलत तर मी तुमच्यावर पोलीस कारवाई करेन अशी गावातील स्त्रियांना धमकी दिली. सदर विषय गावकऱ्यांनी ग्रामपंचायतला कळविला असता ग्रामपंचायतीने वरून आलेल्या आदेशाने आम्ही परवानगी दिली असे सांगितले. ग्रामपंचायतीकडे आलेला मुतारीचा विषय ग्रामपंचायतीने ग्रामस्थांना विचारात घेऊन मार्गी लावायला पाहिजे होता. परंतु ग्रामपंचायतीने जाणून–बुजून ग्रामस्थांना न कळवता धनदांडग्यांना पाठीशी घालण्याचे काम केले आहे. सदर तोडलेली मुतारी आम्हाला पुन्हा बांधून देण्यात यावी आणि संबंधित इसमावर योग्य ती कारवाई करावी कारवाई न झाल्यास ग्रामस्थ तीव्र आंदोलन करू असे निवेदनात म्हंटले आहे.

तहसीलदारांना निवेदन देतेवेळी अशोक जाधव, हिरामण जाधव, रमेश जाधव, स्वप्निल जाधव, रोहित जाधव, वैभव जाधव, राकेश जाधव, कल्पेश जाधव, गौरू जाधव, वंचित बहुजन आघाडी रायगड जिल्हा युवा अध्यक्ष अमित गायकवाड, राज जाधव, आनंद नारायण जाधव, स्वप्निल जाधव व मोहन जाधव आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# तलाव व रस्ता दुरुस्ती तातडीने करण्याची शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची महापालिकेकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील वळवली खालचा तलावाचे तसेच कळंबोली रेल्वे स्टेशनकडे जाणारा रस्ता तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त कैलास गावडे, प्रभागाधिकारी कवठे यांची शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख विश्वास पेटकर यांच्यासोबत शाखाप्रमुख प्रवीण पाटील, ज्येष्ठ शिवसैनिक अशोक पाटील, बळीराम पाटील आदींनी भेट घेतली तसेच निवेदन दिले. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे कि, वळवली गांव हे विकासापासून पूर्णपणे राहिले असून गावातील परंपरागत तलाव हे वाडवडिलांपासून असून महानगरपालिका स्थापन झाल्यापासून या तलावाकडे कायमचे दुर्लक्ष झालेले आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तलावावर करोडो रुपये खर्च करीत असून वळवली गावातील परंपरागत तलावावर एक दमडीही खर्च केलेले नाही. तसेच वळवली वरून कळंबोली रेल्वे स्टेशन व तलावाकडे जाणाऱ्या रस्त्याची १९९५ पासून देखभाल दुरुस्ती ही सिडको करीत होती. परंतु महानगरपालिका स्थापन झाल्यापासून ती कायम दुर्लक्षीत झाली आहे. त्यामुळे तातडीने याची दखल घेवून तल–ावा करिता निधी मंजूर करावा व रस्त्याचे काम तातडीने सुरू करावा अशी मागणी तालुकाप्रमुख विश्वास पेटकर यांनी केली आहे.

# अलिबाग-वडखळ रस्त्याच्या खड्डे ऍक्टिव्हिस्ट दिलिप जोग यांच्या प्रयत्नांना यश : जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत कामे मार्गी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या अनेक वर्षांपासून अलिबाग वडखळ रस्ता दुरावस्थेमुळे अपघातास कारणीभूत ठरत असून रस्त्यावरील अनेक भयानक खड्डे भरण्यासाठी खड्डे ऍक्टिव्हिस्ट सामाजिक कार्यकर्ते दिलिप जोग यांनी रायगड जिल्हाधिकारी यांजकडे एक निवेदन सादर करण्यात आले होते.

सदर निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी रायगड यांनी तात्काळ दखल घेत अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २६ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग , अनुज पालकर, समीर पालकर, दिलीप जोग आणि मंदार ठाकुर (खड्डे क्टिव्हिटीज) यांच्या सोबत बैठक आयोजित करण्यात येऊन सदर बैठकीत प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांनी अलिबाग एच पी पेट्रोल पंप ते क्षीु कंपनी पर्यंतचे रोड वरील सर्व खड्डे तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला बेणणी, जे अनधिकृत स्पीड ब्रेकर टाकलेले काढणे (वाडगाव फाटा व तींनविरा) व धरमतर ब्रिज ते पी एन पी जेट्टीकडे जाण्यामार्गा पर्यंत सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता बनवण्यास तात्काळ मंजुरी दिली आहे. या संदर्भात निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन येत्या दहा ते बारा दिवसात कामाला सुरुवात होणार आहे.

या रस्त्याचा प्रश्नी जोग यांनी गेली सहा सात वर्षे विविध प्रकारची आंदोलने प्रत्यक्ष खड्ड्यात केली आहेत. गड्थ गेट तें वडखळ नाका हा रस्ता कॉंक्रीटचा होण्यामध्ये, तसेच रेल्वेपुलानजिक हाईट बॅरीयर्स लावून घेण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहें.देशाचा ७५ वा.अमृत महोत्सव स्वातंत्र्यदिनी देखील गेल्या बारा वर्षांपासून राष्ट्रीय महामार्ग वडखळ अलिबाग रस्त्याची भयानक दुरावस्था असून याकडे विशेष लक्ष वेधण्यासाठी आम आदमी पक्षाचे मिडिया प्रमुख तथा सामाजिक कार्यकर्ते दिलिप जोग यांनी स्वातंत्र्यदिनी एन.एच.ए.आय. च्या पनवेल येथील कार्यालयासमोर व वडखळ अलिबाग रस्त्यावरील खड्ड्यांमधे लाक्षणिक उपोषण केले होते.

अलिबाग वडखळ रस्त्याच्या प्रश्नी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी तातडीने दखल घेऊन, विशेष लक्ष पुरवून नुकत्याच घेण्यात आलेल्या बैठकीत (NHAI) मार्गाबाबत अधिकारी खोतकर यांना स्पष्ट कालबद्ध सूचना देण्यात येऊन सदर रस्त्याची कामे मार्गी लागणार असल्याने खड्डे ऍक्टिव्हिस्ट दिलिप जोग, अनुज पालकर , समीर पालकर, मंदार ठाकूर, देवव्रत पाटील, गुरुनाथ पाटील, संदेश टेमकर यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# अवैध ढाब्यांवर दारू पिणाऱ्याकडून ५३ हजारांचा दंड वसूल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील अवैध ढाब्यांवर पनवेल ग्रामीण उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. यावेळी ढाबा चालकांसह मद्य सेवन करणाऱ्या ग्राहकांकडून ५३ हजारांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती पनवेल ग्रामीण उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. नविन वर्षाच्या पार्श्वभूमीवर उत्प–ादन शुल्काचे रायगड जिल्हा अधीक्षक कीर्ती शेडगे, उपअधीक्षक विश्वजित देशमुख यांच्या निर्देशानुसार संपूर्ण रायगड जिल्यात अवैध ढाबे, फार्म हाऊस, हॉटेल्स, रिसॉर्ट तसेच अवैध धंद्याविरोधात कारवाई करण्यात येत आहे. या कारवाई अंतर्गत पनवेल ग्रामीण विभागातील दोन ढाब्यांवर कारवाई करण्यात आली आहे. आदई येथील हॉटेल साई कृपा ढाबा आणि टेम्भोडे येथील एकविरा आई या ढाब्यांवर दारूबंदी कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या ढाबेचालकांना प्रथमवर्ग न्यायालय, पनवेल येथे हजर केले असता न्यायालयाने ढाबा चालकांना प्रत्येकी २५ हजार आणि दोन दिवस साधी कैद तर मदय सेवन करणाऱ्या ग्राहकांना प्रत्येकी ५०० रुपये दंड सुनावला आहे. ढाबा चालकांसह मद्य सेवन करणाऱ्या ग्राहकांकडून एकूण ५३ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. हि कारवाई पनवेल ग्रामीण उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक उत्तम आव्हाड, पालवे, संभाजी चव्हाण व सचिन कदम यांच्या पथकाने केली.

बेकायदेशीररित्या ढाब्यांवर, रिसॉर्टवर कोणीही मद्यसेवनास बसू नये. व अवैध पार्ट्या करू नये. अशाप्रकारच्या पार्ट्या करताना आढळून आल्यास मुंबई दारूबंदी कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल

**: उत्तम आव्हाड (निरीक्षक, पनवेल ग्रामीण उत्पादन शुल्क विभाग)**


"KAMAL GAURI HIRU PATIL SHIKSHAN SANSTHA'S"

**B.K.PATIL INSTITUTE OF PHARMACY**

(Affilliated to University of Mumbai MSBTE, DTE, Approved by AICTE PCIU/S12 OF Pharmacy Act 1948)

Add : Plot No.29, Sector-11, Taloja, Navi Mumbai-410208
Email : bkpatilpharmacy2019@gmail.com

Shri. Babandada Patil Chairmen / Founder
**Email : bkpatilpharmacy@gmail.com**
**Website : www.bkpiop.in**
Date :

**ADMISSION NOTICE 2022-23 (D.Pharm)**

Application are invited from the eligible condidates for the admission to First Year Post HSC Diploma in Pharmacy under institute level quota (12 Seats) and seats remained vacant after CAP rounds.

Eligibility :- As per the norms prescribed by Government of Maharashtra Mumbai

Institute Code : 3508

**ADMISSION SCHEDULE**

| Sr. No. | Activity | Date |
|---|---|---|
| 1 | Application form distribution & acceptance (Along with attested copies of all documents) | 27/12/22 to 28/12/22 (9 a.m to 5 p.m) |
| 2 | Display of Final List | 29/12/2022 (9 a.m to 5 p.m) |
| 3 | Reporting & Confirmation of admission by paying fees to the institute office (along with Original Documents) | 30/12/2022 (9 a.m to 5 p.m) |

**Principal**